महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

फोन नं.०२०/ २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/ २६१११११५३

क्र.उशिस/ माअक/ परी-८/ २००९ दि. २२/१/ २००९

**परिपत्रक**

**विषय** – केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ नुसार प्राप्त होणाऱ्या प्रकरणावरील कार्यवाहीबाबत.

उपरोक्त विषयाबाबतची समक्रमाकाची दिनांक १५/९/०६, २१/९/०६, ५/१/०७, २१/२/०७, १५/६/०७, ३१/१/०८, ९/९/२००८ ची परीपत्रके पहावीत. सदर परिपत्रकाव्दारे अतिशय सुस्पष्ट सुचना देऊनही त्यानुसार कार्यवाही होत नसल्याची गंभीर बाब निदर्शनास आलेली आहे. सदर बाब अत्यंत खेदजनक आहे. सदर परीपत्रकाव्दारे सर्व जनमाहीती अधिकारी/ सहायक जनमाहीती तसेच सर्व कर्मचा-याना पुनश्च: सुचना देण्यात येत आहेत. या सुचनाचे सर्वानी **अतिशय काटेकोर पालन करावे.**

१. सर्व अर्जावर प्राधान्याने १० दिवसाच्या आत. मात्र असाधारण प्रकरणीच २० दिवसात उत्तर पाठवावे.

२. जनमाहिती अधिका-याने अर्जास उत्तर देताना पत्राच्या शेवटी पुढील मजकुराचा अंतर्भाव करावा. **"सदर उत्तराने समाधान न झाल्यास आपण प्रथम अपील प्राधिका-याकडे (नांव, पदनाम, पत्ता, दूरध्वनी इ.) अपिल करुन शकता."**

३. माहीती अर्जात मागविलेली माहीती संचालनालयाशी संबंधित नसेल तर माहीती अधिकार कायदा २००५ नियम ६ (३) नुसार असा अर्ज पाच दिवसात संबधिताकडे पाठवावा.

४. सर्व सहायक माहीती जनमाहीती अधिकाऱ्यांनी त्यांना नेमून दिलेल्या शाखेकडे प्राप्त होणा-या अर्जाबाबतची नस्ती त्यांच्या अभिप्रायासह जनमाहिती अधिका-याकडे पाठवावी व प्रतीमाह सर्व प्रकरणाचा आढावा घ्यावा.

५. दरमहा प्राप्त होणा-या अर्जावर शाखेने केलेल्या कार्यवाहीचा मासिक जिल्हानिहाय अहवाल **प्रत्येक महिन्याचे २ तारखेपर्यंत** माहिती अधिकार कक्षास सहायक जनमाहिती/ जनमाहिती अधिकारी यांनी सादर करावा.

६. माहिती अधिकार कायद्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जास दिलेल्या उत्तराची एक प्रत माहिती अधिकार कक्षाकडे त्याच दिवशी देण्याची दक्षता घ्यावी. माहिती अधिकार कक्षास प्रत देण्यास काही कर्मचारी जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले असून यापुढे अशी बाब निदर्शनास आल्यास संबधिताविरुध्द म.ना.से. (वर्तणुक) नियम १९७९ कार्यवाही करण्यात येईल.

७. अर्जदारास माहीती देण्यामध्ये कसूर झाल्यास व कसुरदाराकडून नुकसानभरपाई अथवा दंडाची मागणी झाल्यास त्या प्रकरणी सहायक जनमाहिती व जनमाहिती अधिकाऱ्यासह संबंधित कर्मचारी हे व्यक्तीश: जबाबदार राहतील व दंडाची रक्कम प्रतिदिन रुपये २५०/- ही संबधिताचे वेतनामधून वसुल करण्यात येईल त्याचप्रमाणे संबधिताविरुध्द म.ना.से. (वर्तणुक) नियम १९७९ नुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी **संबंधितावर निश्चित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

(डॉ. रा. वि. किर्दक)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१

१ --
**सर्व जनमाहिती अधिकारी/सहायक जनमाहिती अधिकारी**
मवि १, २, ३, विशि, प्रशा १, २, ३, लेखा १, २, न्यायालयीन कक्ष, शिष्यवृत्ती शाखा,

२/ सदरचे परिपत्रक सर्व संबंधित कर्मचाऱ्याचे निदर्शनास आणण्यात यावे व त्याकरीता संबधिताची त्यावर स्वाक्षरी घेण्यात येऊन त्याची प्रत माहिती अधिकार कक्षास द्यावी.